दिनांक १६ फेब्रुवारी, २०१८ रोजी मा. पंतप्रधान महोदयांचा विद्यार्थ्यांशी संवाद.

महाराष्ट्र शासन

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग

शासन परिपत्रक क्र.संकीर्ण २०१८/(२७/१८)/एस.डी.-६

हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय (विस्तार), मुंबई-३२.
दिनांक :- ७ फेब्रुवारी, २०१८

वाचा- भारत सरकारचे पत्र क्र. 11-ADC20Note/4/2018-ADC(Acad)
दि. ५ फेब्रुवारी, २०१८

परिपत्रक

सन्माननीय पंतप्रधान महोदय हे शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसमवेत "परीक्षेतील ताणतणाव कसा कमी करता येईल", या विषयासंदर्भात दि. १६ फेब्रुवारी, २०१८ रोजी सकाळी ११.०० ते १२.०० या कालावधीत संवाद साधणार आहेत. मा. पंतप्रधान महोदयांनी "Exam warriors" हे पुस्तक देखील प्रसिध्द केले असून त्याचे विमोचन दि. ३ फेब्रुवारी, २०१८ रोजी करण्यात आले आहे.

या अनुषंगाने ज्या शालेय विद्यार्थ्यांना काही प्रश्न विचारायचे असतील तर त्यांनी ते येत्या २ दिवसात https://innovate.mygov.in/pm-interaction-with-students या संकेतस्थळावर विचारावेत. यापैकी निवडक प्रश्नांवर दि. १६ फेब्रुवारी, २०१८ रोजी आयोजित कार्यक्रमामध्ये चर्चा करण्यात येईल.

मा. पंतप्रधान महोदय विशेष करुन माध्यमिक, उच्च माध्यमिक व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांशी संवाद साधू इच्छित असून याचे प्रसारण दूरदर्शनच्या D.D. National, D.D. News व D.D. India या Channels वरुन होणार आहे. तसेच All India Radio, MHRD चे Youtube Channel, पंतप्रधान कार्यालयांचे संकेतस्थळे, MyGov.in, Facebook Live व स्वयंप्रभा Channel या माध्यमातून देखील या कार्यक्रमाचे प्रसारण होणार आहे.

सदर कार्यक्रम अधिकाधिक विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचावा याकरिता सर्व माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये दूरदर्शनच्या माध्यमातून सर्व विद्यार्थ्यांपर्यंत या कार्यक्रमाचे प्रसारण करणेबाबतच्या सूचना या परिपत्रकान्वये शिक्षण विभागातील क्षेत्रिय अधिकारी व सर्व माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांचे मुख्याध्यापक यांना देण्यात येत आहेत. शाळांमध्ये याकरिता दूरदर्शन संचाची व्यवस्था करण्यात यावी. प्रोजेक्टर, स्क्रिन इ. सुविधा उपलब्ध असल्यास शाळांनी सभागृहांमध्ये या कार्यक्रमांचे प्रसारण दाखविण्याची देखील व्यवस्था करावी.

राज्यातील सर्व माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा / कनिष्ठ महाविद्यालयांनी या कार्यक्रमामध्ये सहभागी व्हावे. तसेच, परीक्षेचा तणाव प्रामुख्याने इ. १० वी व इ. १२ वी च्या विद्यार्थ्यांवर असल्याने इ. ९ वी ते इ. १२ वी ची मुले सहभागी होतील हे ही पहावे. तसेच सदर कार्यक्रमाचा तेवढा एक तास वगळून उर्वरित वेळेत माध्यमिक व उच्च माध्यमिक स्तरावरील प्रात्यक्षिक परीक्षांच्या वेळेचे पुनर्नियोजन शाळा स्तरावर करावे.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेताक २०१८०२०८१५३१२४९३२१ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Suryakant B. Patil

Digitally signed by Suryakant B. Patil
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School Education And Sports Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=1e4d61e2654004fd87056f70e5ae32fb1d62013750a34b063c53c71f673388b9, cn=Suryakant B. Patil
Date: 2018.02.08 15:37:50 +05'30'

(सु.ब. पाटील)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति :-

१. मा. आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे.
२. शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
३. शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
४. संचालक, महाराष्ट्र विद्याप्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
५. अध्यक्ष, राज्य मंडळ, महाराष्ट्र राज्य, पुणे.
६. सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक.
७. सर्व शिक्षणाधिकारी, प्राथमिक व माध्यमिक यांना विनंती करण्यात येत आहे की, सदरचे परिपत्रक सर्व कनिष्ठ महाविद्यालयांचे प्राचार्य/ शाळांचे मुख्याध्यापक यांचे निदर्शनास आणण्यात यावे.
८. सर्व माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांचे मुख्याध्यापक, कनिष्ठ महाविद्यालयांचे प्राचार्य.
९. सर्व सहसचिव /उपसचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०. निवड नस्ती, एस.डी. ६.